**रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुल आडगाव मध्ये पार पडला जयंती सोहळा .**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुल आडगाव मध्ये पदमभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांची 136 वी जयंती सोहळा पार पडला .या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री .भगीरथ (काका) शिंदे साहेब ,(व्हाईस चेअरमन रयत शिक्षण संस्था सातारा ) हे होते .या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील नूतन इमारतीच्या सहा वर्गखोलीच्या उदघाटन करण्यात आले . या नूतन इमारतीचे उदघाटन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन आदरणीय श्री .चंद्रकांत दळवी साहेब ( सेवानिवृत्त , आय.ए .एस .) यांच्या हस्ते करण्यात आले .

उदघाटन प्रसंगी बोलताना आदरणीय दळवी साहेबांनी कर्मवीर भाऊराव पाटलांचा इतिहास मांडत कर्मवीर आण्णांनी कश्या पद्धतीने लोकसहभाग घेत गावोगावी जाऊन शाळा उभारल्या याविषयीची माहिती दिली . निढळ सारख्या एका दुष्काळी गावातील रयत शिक्षण संस्थेतील शाळेतील शिकलेला विद्यार्थी , त्याच संस्थेच्या चेअरमन पदापर्यंत पोहचतो यामागे फक्त डॉ .कर्मवीर भाऊराव पाटलांचे विचार आहेत असे साहेबांनी सांगितले . लोकसहभागामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक ,माजी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आपण काय करू शकतो याचे उदाहरण देत आडगाव विद्यालयाच्या झालेल्या कामाबद्दल कौतुक केले .

आडगाव गावाचे भूषण ज्यांनी आपल्या गावाचे नाव सातासमुद्रापलिकडे नेले असे श्री .विलासरावजी शिंदे यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे ही आभार मानले . "सत्व फाऊंडेशन" अंतर्गत कश्या रीतीने ग्रामविकास केला जात आहे,हे साहेबांनी आपल्या मनोगतात सांगितले . विद्यालयात चाललेल्या उपक्रमांचे आदरणीय दळवी साहेबांनी कौतुक केले. रयत शिक्षण संस्थेला आता गुणवत्तेच्या बाबतीत पुढे न्यायचं आहे अन हे काम फक्त माझा रयत सेवकच करू शकतो असे विचार साहेबांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले . आदरणीय दळवी साहेबांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे कौतुक करत विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री .हिंडे एम .बी .यांनी केलेल्या कामाबद्दल तसेच त्यांच्या सेवापूर्तीच्या शुभेच्छा दिल्या.












